**नगरनोंदी**

# वस्ती : फुरक्या...

## निलीमा बंडेल्लू–जाधव

*साधारण १८१७मध्ये अमेरिकन मिशनरी नगरमध्ये आले. त्यांनी शाळा काढल्या. दवाखाने सुरू केले... दलित गरीब तसेच उच्चवर्णीय गरीब मुलं मुली शिकू लागली... इथल्या दलित व धर्मांतरित कामगारांना काम मिळाले... गोऱ्या मिशनरी साहेबांच्या बंगल्यावर काम करणाऱ्या अनेक पिढ्या येथे तयार झाल्या. त्यांची संस्कृती तयार झाली... ही संस्कृती कष्टकऱ्यांचीच होती, पण जगण्याशी ख्रिस्ती मूल्ये घेऊन ती बहरली... पुढे मिशनरी गेले आणि या कुटुंबांची परिस्थिती बदलली... वस्त्या कंगाल होत गेल्या. शहराच्या कोठी भागातील वस्तीतल्या ख्रिस्ती समाजजीवनाच्या प्रातिनिधिक कहाण्या.*

लेखिका सेवानिवृत्त अधिकारी असून
अहमदनगरस्थित सामाजिक कार्यकर्त्या आहेत.
ईमेल– neelima.bandellu@gmail.com

रघ्याचं दोन फळ्यांचं किराणा मालाचं दुकान सबिनाआपाच्या घराला खेटूनच होतं...त्याचा पोरगा आता १४ वर्षांचा झाला होता. त्याच खरं नाव ल्युथर... पण लहानपणापासून त्याचं नाक सतत गळायचं... तो सारखी फुरफुर करायचा म्हणून सारे त्याला फुरक्या म्हणायचे... रघ्याची बायको फुरक्याच्या जन्मानंतर काही महिन्यात बाळंतरोगानं गेली. तिची आणि सबिनाची खूप दाट मैत्री, कारण दोघींचं माहेर एकच होतं... लग्नानंतर पहिले ४ वर्ष तिला मूलबाळ झालं नाही. त्यानंतर गरोदर राहिली... ९ महिन्याचे पूर्ण दिवस भरले असतानांच पोटातल्या पोरीनं जन्माला येतायेताच शेवटचा श्वास घेतला... त्यानंतर वर्षातच पुन्हा गरोदर राहिली... वस्ती म्हणायची, पोरीनं जीव दिला आणि मायची कूस वाहती केली... आणि फुरक्याच्या जन्मानंतर अचानक ती खूप आजारी झाली आणि ३ महिन्यातच बाळंतरोगानं गेली... सबिना आपा ८ दिवस रडत होती... हे ३ महिन्याचं लेकरू सांभाळायला रघ्याची म्हातारी गावहून इथं आली. जीवाच रान करुन तिनं पोरगं वाढवलं... रघ्यानं मात्र दुसर लग्न केलं नाही. आणि पोरगी तरी कोण देणार? दोन फळ्यांच्या या काजळी भरलेल्या दुकानात काही फार माल नसायचा. एकतर माव्याच्या पुड्या, तंबाकू, चुन्याच्या पुड्या, रुपयाचे शँपू, पोंगे, काळवंडलेले पाव, डायखाऱ्या आणि थोडं फार डाळ तांदूळ तेल... छटाक तेल, रुपयाची मसाला पुडी, खोबऱ्याचा तुकडा असं एकवेळच्या कालवणाला लागणारं सामान नेणारंच गिऱ्हाईक जास्त... त्यापेक्षा जास्त काही रघ्याही देऊ शकत नव्हता, गेल्या २ वर्षांपासून त्याची म्हातारी मार्केटयार्डात जाऊन कोंथबीर, कांदे-बटाटे, टमाटे, स्वस्त भाज्या नि उरलेलं मटेरियल आणायची. उरलेलं म्हणजे बाजार संपताना काही व्यापारी माल टाकून जायचे. ही म्हातारी त्यातलं चांगलं निवडून आणायची. इतकंच नवं हिरवं त्याच्या दुकानात दिसायचं. (वस्तीतल्या बायांची स्वस्तात सोय व्हायची म्हणून त्याही यायच्या इथे) पण इथंही बराचदा तोटाच असायचा. कारण कोथंबीरीच्या दोन काड्या, आल्याचा तुकडा, एखाददोन कांदे, एखादा टमाटा हट्टानं, आग्रहानं, वाद घालून बाया फुकटच मागायच्या. पण दोन चार पैसे सुटायचे तेही कमी नव्हतं.

तालुक्याच्या बाजारातून येताना सबिनाआपा भेळ, भत्ता, गोडी शेव आणायचीच. कधी रेवड्याही असायच्या... मग तब्बोच्या

मैत्रिणींना पेपरच्या तुकड्यावर वाटे करून हमखास ठेवलेलेच असायचे, एक वाटा असायचा फुरक्याचा... तो नसला तर सबीना आपा त्याची पुडी वर शिंक्यावर ठेवायच्या... पोरी तिला खूप चिडवायच्या. 'देख देख आम्मी उसके बेटे के वास्ते छुपाके रखरी...' सबीनाआपा म्हणायची 'हॉ, मेरा बेटाच है वो. बिन माँ का बच्चा मेरे सहेलीका तो मेराच हुआ ना...' एक खास लगाव होता तिला या लेकरावर... रघ्याची आई पोरगं मोठं झाल्यावर परत गावी गेली आणि या बापलेकाच्या पोटाचा प्रश्न उभा राहिला... सकाळी वातीचा स्टोव्ह पेटवून चहा उकळला जायचा, आणि दुकानातील पाव, डायखारी याचा नाष्टा व्हायचा. सबीना तालुक्याच्या बाजारातून येताना जमल तेवढा भाजीपाला आणायची न चुकता. स्वस्तातला बाजार संपताना स्वस्तात मिळणाऱ्या भाजीपाल्याचं ओझं घेऊन ती आणायची रघ्याच्या दुकानासाठी... दुपारी रोज एस्तेर आंटी डबा द्यायची. ती कॉलेजच्या पोरांचे १० डबे करायची. पहाटे ४ला तिचं काम सुरू व्हायचं... ८पर्यंत स्वयंपाक डबे करायची. डबे भरून १० वाजेपर्यंत तिचा नवरा हॉस्टेलला डबे पोचवून यायचा. अंबाडीच्या सुताला रंग देऊन त्यापासून सुंदर पर्सेस, पायपुसण्या, शोपीस तयार करण्याचं काम शेजारच्याच मिशन कंपाउडमध्ये चालायचं. तेथे वस्तीतल्या बायाच कामाला जायच्या. एस्तेरही जायची... तर सारा आंटीला दया यायची रघ्याची आणि फुरक्याची; ती आपलेपणानं या दोघांचा डबा द्यायची... निम्म्या पैशात दुपारची सोय व्हायची. आताशा, फुरक्या डाळतांदळाची खिचडी करायला शिकला होता. म्हणजे काहीतरी शिजवायचा. ते बापलेक आनंदाने खायचे...

फुरक्या शाळेतही जात होता. नित्यनियमाने. बिनआईच लेकरू चांगलं शिकंल अन् बापाचं पांग फेडंल असं शेजारीपाजारी बोललं जायचं. तो काही झालं तरी शाळा बुडवायचा नाही. एकदा अचानक फुरक्या गायब झाला... शोधशोध सुरू झाली. शाळेत विचारलं तर शिक्षक म्हणाले हा येतच नव्हता शाळेत... काही टारगट पोरांनी माहिती दिली, याला जुगाराचा नाद लागला होता. त्याच्या मित्रांकडे चांगले कपडे, घड्याळ असायची तर हाही झटपट पैसा मिळवायच्या नादात जुगार खेळू लागला होता... आणि कर्ज वाढलं तेव्हा घाबरला... त्याला पोरं रोज येऊन दमदाट्या करायला लागली... आणि या कारणानं तो गाव सोडून निघून गेला होता... साऱ्या वस्तीनं त्याला शोधण्याचा चंग बांधला... पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पण गरीबाच पोरगं होतं... बरं ही काही खंडणीची केस नव्हती... पोरगं बिथरलं म्हणून गेलं होतं... पोलीसांचा कयास होता की येईल घरी दोन दिवस उपाशी राहिला की... पोलीसांनी दिलासा दिला. पण रघ्याच्या एकुलता एक सहारा होता तो... बिन आईचा, कष्टानं वाढवलेला... ४ दिवस त्यानं दुकानच उघडलं नाही... रात्रंदिवस रडायचा. 'देवबाप्पा माज लेकरू परत आन, फसू देऊ नको...' रोज आणभाका करायचा. सबिना आपाही रोज दुआ मांगायची त्याच्यासाठी... एरवी फुरक्याला हसणाऱ्या, चेष्टा करणाऱ्या पोरीही त्याच्यासाठी प्रार्थना करीत होत्या. दुवा करीत होत्या... ८-१० दिवसांनी रघुनं दुकान उघडलं पण लेकराची आठवण आली की, तो परत खचायचा... आईविना पोरगं कसं वाढंल. याचा पाढा वाचायचा... त्याची म्हातारी परत आली होती... आता वय झाल्यानं तिही चाचपडायची त्या घरात... मोठा आघात झाला होता त्या घरावर... रडतरडत ३ महिने गेले... पोराचा काहीच पत्ता लागत नव्हता... नको त्या विचारानं काळजाचा थरकाप व्हायचा म्हातारीचा अन रघुचा... आणि एक दिवस अचानक पहाटेपहाटे फुरक्या घरी आला. कृश झालेला, कपडे फाटलेला... भेसूर चेहरा, घाबरलेला. सारी वस्ती गोळा झाली रघ्याच्या दुकानासमोर, दोघं बापलेक गळ्यात पडून ढसाढसा रडले... म्हातारीला तर शब्दच फुटेना... अर्धा तास फक्त रडत होते ते तिघे... सबिनाआपाला लेकरू परत आल्याचा आनंद होता

कारण जसा हा घर सोडून पळाला होता, तशी तिला मैत्रिणीची- त्याच्या आईची खूप आठवण यायची रोज. पण पोर घरी आलं होतं परत... गरम पाण्यानं पोरानं आंघोळ केली. शरीरावर बऱ्याच जखमा होत्या लहानमोठ्या... कपडे बदलले म्हातारीनं. चहा उकळला ढणाढणा, सबिनानं जेवण वाढलं... पोरा नंतर सांग तू काय झालं, आता आलास ना, आमच्यासाठी लय मोठी गोष्ट झाली, वस्ती बोलत होती. थोड शांत झाल्यावर त्याने सगळं सांगितलं. फुरक्यानं शहर सोडलं ते थेट विनातिकीट मुंबई गाठली होती... त्या महाकाय नगरात तो भांबावला... रेल्वे पोलीसांनी हेरलं त्याला. खूप पूछताछ झाली, मग तो पोलीस स्टेशनमधून पळाला, रेल्वे फलाटावर बसला... पोटात भूक लागलेली पाणी नाय... त्यासारखे बरेच पोरं होती आजूबाजूला. काहीनी खाण्यापिण्यापोटी दोस्ती करायचा प्रयत्न केला. तो म्हटला मला काम द्या. पण त्याला कोण काम देणार? पोरांनी फसवायचा प्रयत्न केला... काहींनी अनैतिक कृत्य करायचा प्रयत्न केला... कधी पुलाखाली, कधी फुटपाथवर झोपायचा... खूप वाईट अनुभव आले. मारही खाल्ला बरेचदा... खूप मिनतवाऱ्या करुन एका ठिकाणी कपबश्या विसळायचं काम मिळालं. तिथही रोज वेगळा त्रास... कसेबसे ३ महिने काढले... मोकळ्या आभाळाखाली छपराविना किती घाण दुनिया आहे हे त्यानं अनुभवलं... आता त्याच्या बापाचं घर एका मोठ्या महालासारख वाटत होतं त्याला... मग त्यानं निश्चय केला, काही झालं तरी घर गाठायचं... रात्रीच्या रेल्वेत बसला अन पहाटे घरी परतला होता. आज इतक्या दिवसांनी तो पोटभर जेवला, स्वच्छ झाला... सुरक्षित झोपला... या ३ महिन्यात त्यान जी दुनियादारी पाहिली त्यानंतर तो खूपच सुधारला, जबाबदार झाला. बापाच्या बरोबरीनं कामधंदा करू लागला. स्वत:च्या हातानं त्यानं सणासाठी घर दुकान रंगवलं... सामान भरलं... दोन फळ्यांचं का होईना हक्काच घर होतं. प्रेमाची माणसं होती... सुरक्षितता होती. खायला पोटभर होतं. खूप मेहनतीनं बापलेकानं नवा संसार उभा केला... तो आता रघ्याची सावली झाला. म्हातारपणाची काठी झाला... एक जबाबदार मुलगा झाला. फुरक्याला लोक आता ल्युथर म्हणू लागले. आजीनं अंथरुण धरलं तेव्हा ल्युथरनं तिची सेवा केली. दवापानी केली. म्हातारीनं सुखानं डोळे मिटले... सोनेरी क्रॉस लावून केलेल्या भक्कम पेटीत आजीला घातलं... सगळी वस्ती मयतीला गेली. तिसऱ्या दिवशी पोतंभर फुलं आणून कबर सजवली त्यानं. ४० दिवसांनी चर्चमध्ये प्रार्थना ठेवली... वस्तीला जेवण दिलं पुलावाचं. पुन्हा तिघांचे दोघे झाले पण आता रघ्याला पोराचं दोनाचे चार हात करायचे वेध लागले होते. हा दोनचा आकडा त्याला कायमचा हद्दपार करायचा होता.

●

## स्त्रियांच्या अदृश्य श्रमाचे ऑडीट (पान नं ४९ वरून)

काम करत असतात. संघटित/असंघटित क्षेत्रांमध्ये गतकाळापासून विनामोबदला काम करण्याची प्रथा भारतात प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कामगारांना सर्व प्रकारचे, सर्वतोपरी समानतेचे मानवी हक्क मिळणे ही सरकारची व पर्यायाने आपली जबाबदारी आहे असे मला वाटते. ●

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फॉंटमध्ये पाठवावे.